## रेग्युलर दिवाणी मुकदमा नं.२२०/११ मधील नि. ९९ खालील आदेश

१) प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटपासाठी व कब्जासाठी दाखल केला. प्रस्तुत दाव्याचे काम चौकशीवर असुन प्रतिवादी यांनी कैफियत मांडुन वादीचा दावा नाकारलेला आहे.

२) दाव्याचे चौकशीचे दरम्यान वादी नं.३ यांनी नि.६७ ला व वादी नं.१ यांनी नि.९७ ला आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रतिवादीचे वकील तापाने आजारी असल्याने वादी नं.३चे उलटतपासासाठी हजर राहु शकले नाहीत. त्यामुळे वादी नं.३चा उलटतपास नाही (No cross) चा हुकुम झाला आहे. त्यानंतर वादी नं.१ चे प्रतिज्ञापत्र दाखल झालेनंतर त्याचदिवशी उलटतपास नाही (No cross) चा आदेश झाला आहे. तथापि प्रतिवादी आडाणी असल्या कारणाने तसेच प्रतिवादीचे वकिलांचे चुलत्यांचा दशक्रिया विधी त्या दिवशी असलेने वकिलांना कोर्टात येणेस उशिर झाला त्यामुळे अर्ज देणे अशक्य झाले. त्यामुळे उलटतपास नाहीचा आदेश पारीत झाला.

३) दावा वाटपाचा व तुटक कब्जाचा आहे. प्रतिवादींनी कैफियतीमध्ये दावा नाकारला आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींची घरे आहेत. प्रतिवादींना उलटतपासाची संधी न मिळाल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे व त्यांचेवर अन्याय होईल. प्रतिवादींना उलटतपासाची संधी मिळाल्यास अंतिम न्यायनिर्णयाच्या दृष्टीने उपयोगाचे होणार असुन दाव्याचा गुणागुणावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. सबब उलटतपास नाही (No cross) झालेला आदेश रद्द होवुन प्रतिवादींना उलटतपासाची संधी मिळावी अशी विनंती केली आहे.

४) सदरकामी वादी यांनी आपले म्हणणे नि.१०१ वर दाखल करुन प्रतिवादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असुन सर्व मजकुर नाकारला आहे. प्रतिवादींनी दि.१६/३/२०१६ रोजी नि.६७ चा अर्ज देवुन २ वर्षे दाव्याचे काम लांबविले. त्यानंतर नि.९६ चा अर्ज देवुन प्रकरण लोक अदालतीमध्ये ठेवणेसाठी सांगुन पुन्हा दाव्याचे काम लांबविले. वादी नं. १ ते ३ या महिला असुन त्या जेष्ठ नागरिक आहेत. त्याचप्रमाणे वादी नं.१ ते ३ शेतमजुरी करीत असतात. त्यामुळे प्रत्येक तारखेस वादींचे रु.७००/— चे आर्थिक नुकसान होत आहे. सबब प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

५) दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दावा वाटपाचा व तुटक कब्जाचा

आहे. प्रतिवादींनी कैफियतीमध्ये दावा नाकारला आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींची घरे आहेत. प्रतिवादींना उलटतपासाची संधी न मिळाल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे व त्यांचेवर अन्याय होईल. प्रतिवादींना उलटतपासाची संधी मिळाल्यास अंतिम न्यायनिर्णयाच्या दृष्टीने उपयोगाचे होणार असुन दाव्याचा गुणागुणावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. परंतु वादींचा विचार करता वादींचे प्रत्येक तारखेस आर्थिक नुकसान होत आहे. जर नुकसानभरपाई देणेचे अटीवर अर्ज मंजुर केलेस वादींचे काहीही नुकसान होणार नाही. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादींनी वादी नं.१ व ३ यांना प्रत्येकी रक्कम रु.३००/— देणेचे अटीवर अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादींना रक्कम मिळाल्यावर पुढील तारखेस उलटतपासाकरीता हजर राहावे.

फलटण. (अर्चना ह. ठाकुर)
ता.०६/०३/२०१९ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण.